# मंत्रिमंडळ निर्णय

## २२ ऑगस्ट २०१६

## ( बैठक क्र. ९७ )

| अ.क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| १ | राष्ट्रीय विमान वाहतूक धोरणांतर्गत केंद्राशी करार<br>राज्यातील १० विमानतळांच्या विकासासाठी विविध सवलती देण्यास मंत्रिमंडळाची मान्यता | सामान्य प्रशासन (विमानचालन) |
| २ | वस्तू व सेवा कर विधेयकाच्या (जीएसटी) मंजुरीसाठी विधानमंडळाचे २९ ला एक दिवसाचे विशेष अधिवेशन | सामान्य प्रशासन विभाग (संसदीय कार्य) |
| ३ | जीएसटी संदर्भातील विधेयकाच्या अनुसमर्थन प्रस्तावास मान्यता | वित्त |
| ४ | महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण<br>प्राधिकरणाच्या अध्यक्ष व सदस्यांच्या पात्रतेबाबत अधिनियमात सुधारणेसाठीचा अध्यादेश पुनर्रप्रख्यापित करण्यास मान्यता | जलसंपदा |
| ५ | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम-१९६० मध्ये सुधारणा<br>सहकारी संस्थांच्या मंडळावर कर्मचाऱ्यांना वाढीव प्रतिनिधित्व देण्यासाठीचा अध्यादेश पुनर्रप्रख्यापित करण्याचा निर्णय | सहकार |
| ६ | अनियमित बेकायदेशीर ,कामकाजामुळे अडचणीतील बँका<br>सहकारी बँकांच्या संचालकांना अपात्र ठरविण्यासाठीचा अध्यादेश पुनर्रप्रख्यापित करण्याचा निर्णय | सहकार |
| ७ | शेतकऱ्यांची फळे व भाजीपाला विक्री<br>बाजारपेठेचे पर्याय खुले करण्यासाठी अध्यादेश पुनर्रप्रख्यापित करण्याचा निर्णय | पणन |

सामान्य प्रशासन विभाग (विमानचालन)

<u>राष्ट्रीय विमान वाहतूक धोरणांतर्गत केंद्राशी करार</u>

**राज्यातील १० विमानतळांच्या विकासासाठी**

**विविध सवलती देण्यास मंत्रिमंडळाची मान्यता**

केंद्र शासनाच्या नागरी विमान वाहतूक मंत्रालयाने जाहीर केलेल्या प्रादेशिक जोड योजनेसाठी (रिजनल कनेक्टीव्हीटी स्कीम) राज्य सरकारचा केंद्र शासनाचे नागरी विमान वाहतूक मंत्रालय आणि भारतीय विमानतळ प्राधिकरण यांच्याशी उद्या (दि.२३ ऑगस्ट) सामंजस्य करार करण्यात येणार आहे. या कराराच्या मसुद्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या करारांतर्गत विविध सवलती देण्यात येणार आहेत.

राष्ट्रीय नागरी विमान वाहतूक धोरणात देशातील वेगवेगळे प्रदेश विमानसेवेने जोडण्यासाठी आर्थिक मदत देण्यासह त्यासाठी आवश्यक असणाऱ्या पायाभूत सुविधांचा विकास करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यासाठी केंद्र सरकारने या धोरणांतर्गत प्रादेशिक जोड योजना (रिजनल कनेक्टीव्हीटी स्कीम) प्रस्तावित केली आहे. त्याअंतर्गत केंद्र शासनाचे नागरी विमान वाहतूक मंत्रालय आणि भारतीय विमानतळ प्राधिकरण यांच्याशी महाराष्ट्र सरकार २३ ऑगस्ट रोजी सामंजस्य करार करणार आहे. या करारात राज्याकडून द्यावयाच्या सवलती उल्लेखित होणार आहेत. त्यामुळे या कराराच्या मसुद्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

योजनेच्या पहिल्या टप्प्यात राज्यातील शिर्डी, अमरावती, गोंदिया, नाशिक, जळगाव, नांदेड, सोलापूर, कोल्हापूर, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या १० शहरातील विमानतळांचा समावेश करण्याची शिफारस राज्य सरकारने केंद्राकडे केली आहे.

सामंजस्य कराराच्या मसुद्यात राज्य शासनाकडून द्यावयाच्या सवलतींबाबतच्या तरतुदी समाविष्ट आहेत. या योजनेत समाविष्ट असलेल्या विमानतळांसाठी लागणाऱ्या इंधनावरील मुल्यवर्धित कराचा दर १० वर्षासाठी एक टक्का इतका करण्यात येईल, विमानतळांच्या पुनरूज्जीवनासाठी आवश्यक तेवढी जमीन विनामुल्य उपलब्ध करून देण्यात येईल, या विमानतळांना रस्ते, रेल्वे, मेट्रो, जलवाहतुकीचे मार्ग आदींनी जोडण्यात येईल, विमानतळांना पोलीस आणि अग्निशामक सेवा नि:शुल्क उपलब्ध करून देण्यात येतील, राज्य शासनाकडून या विमानतळांना वीज, पाणी आणि इतर सुविधा भरीव सवलतीच्या दरात उपलब्ध करून दिल्या जातील, या विमानतळांच्या प्रादेशिक मार्गावर विमानवाहतुकीचा खर्च आणि अपेक्षित उत्पन्न यातील तफावत (Viability Gap) भरून काढण्यासाठी संबंधित विमानतळ परिचालकास (Airport Operator) देय असलेल्या निधीची (Viability Gap Funding-VGF) तरतूद केंद्र सरकार ८० टक्के तर राज्य सरकार २० टक्के यापद्धतीने केली जाईल आदी सवलतींचा त्यात समावेश आहे. याशिवायही राज्य सरकार अधिक सवलती देऊ शकेल, असे या मसुद्यात आश्वासित करण्यात आले आहे.

-----०-----

सामान्य प्रशासन विभाग
(संसदीय कार्य)

## वस्तू व सेवा कर विधेयकाच्या (जीएसटी) मंजुरीसाठी विधानमंडळाचे २९ ला एक दिवसाचे विशेष अधिवेशन

संविधान (एकशेबावीसावी सुधारणा) विधेयक, २०१४ च्या अनुसमर्थनासाठी (Ratification) अर्थात वस्तू व सेवा कर विधेयकाच्या मंजुरीसाठी (जीएसटी) २९ ऑगस्ट रोजी राज्य विधानमंडळाचे एक दिवसाचे विशेष अधिवेशन अभिनिमंत्रित करण्याची शिफारस राज्यपालांना करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

संविधान (एकशेबावीसावी सुधारणा) विधेयक, २०१४ हे विधेयक संसदेच्या दोन्ही सभागृहांनी मंजूर केले आहे. या विधेयकातील सुधारणांना भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३६८ खालील खंड (२) च्या उपखंड (ख) आणि (ग) मधील तरतूद लागू होत असल्यामुळे विधेयकाला राष्ट्रपतींची संमती मिळण्यासाठी निम्म्याहून अधिक राज्य विधानमंडळांचे अनुसमर्थन आवश्यक आहे. त्यामुळे या विधेयकाच्या अनुसमर्थनासाठी राज्य विधानमंडळाचे एक दिवसाचे अधिवेशन अभिनिमंत्रित करून त्याच दिवसाच्या सभागृहाच्या बैठकीच्या समाप्तीनंतर संस्थगित करण्याविषयी राज्यपालांना शिफारस करण्याचा निर्णय घेण्यात आला.

-----o-----

वित्त विभाग

## जीएसटी संदर्भातील विधेयकाच्या अनुसमर्थन प्रस्तावास मान्यता

संपूर्ण देशामध्ये अप्रत्यक्ष कराची एकसमान पद्धती लागू करण्याच्या हेतूने वस्तु व सेवा कर प्रणालीचा अवलंब करण्यासाठी संसदेच्या दोन्ही सभागृहांनी मंजुरी दिलेल्या संविधान (एकशे बावीसावी सुधारणा) विधेयक २०१४ ला अनुसमर्थन दर्शवण्यासाठी प्रस्ताव विधिमंडळासमोर सादर करावयाच्या प्रस्तावास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

वस्तु व सेवा कर प्रणाली अर्थात जी.एस.टी. देशात लागू करण्यासाठी संविधानात बदल करणे आवश्यक होते. त्यानुसार संविधानात बदल करण्याबाबतचे विधेयक लोकसभेत यापूर्वी मांडण्यात आले होते. लोकसभेने संविधान (एकशे बावीसावी सुधारणा) विधेयक-२०१४ हे विधेयक ६ मे २०१५ रोजी मंजूर केल्यानंतर राज्यसभेकडे संमतीसाठी पाठविण्यात आले होते. राज्यसभेने या विधेयकात काही बदल सूचविले. त्यानंतर या बदलासह ३ ऑगस्ट २०१६ रोजी राज्यसभेने त्यास मंजुरी दिली. हे बदल स्वीकृत करीत लोकसभेत हे संविधान सुधारणा विधेयक ८ ऑगस्ट २०१६ रोजी मंजूर करण्यात आहे.

लोकसभा व राज्यसभेने मंजुरी दिलेल्या या संविधान (एकशे बावीसावी सुधारणा) विधेयक-२०१४ चे कायद्यात रुपांतर करण्यासाठी संविधानाच्या अनुच्छेद ३६८(२) खालील परंतुकात नमूद केल्याप्रमाणे या दुरुस्तीला देशातील किमान निम्म्या राज्यांच्या विधिमंडळांचे अनुसमर्थन मिळणे आवश्यक आहे.

त्यानुसार असे अनुसमर्थन घेण्यासाठीचा प्रस्ताव आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत ठेवण्यात आला होता. अनुसमर्थनाचा हा प्रस्ताव विधिमंडळासमोर ठेवण्यास आज मंत्रीमंडळाने मान्यता दिली असून त्यानुसार हा प्रस्ताव विधिमंडळासमोर ठेवण्यात येणार आहे.

-----०-----

जलसंपदा विभाग

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

**प्राधिकरणाच्या अध्यक्ष व सदस्यांच्या पात्रतेबाबत**

**अधिनियमात सुधारणेसाठीचा अध्यादेश पुनर्रप्रख्यापित करण्यास मान्यता**

प्राधिकरणाच्या अध्यक्ष व सदस्यांच्या पात्रतेच्या निकषांबाबत नव्याने तरतूद करण्यासाठी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५ च्या कलम ४(२) मध्ये सुधारणा करण्यासाठीचा अध्यादेश पुनर्रप्रख्यापित करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

यासंदर्भात सन २०१६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३ हा १७ जून २०१६ रोजी काढण्यात आला होता. महाराष्ट्र विधानमंडळाच्या पावसाळी अधिवेशनामध्ये संबंधित विधेयकावर विधानसभेत चर्चा होऊन २६ जुलै २०१६ रोजी त्यास संमती देण्यात आली. मात्र, हे विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याच्या प्रस्तावास विधानपरिषदेकडून मान्यता देण्यात आली. त्यामुळे विधानपरिषदेत चर्चा न झाल्याने ते मंजूर होऊ शकले नाही. त्यामुळे हा अध्यादेश पुनर्रप्रख्यापित करण्याचा निर्णय आज घेण्यात आला.

अधिनियमाच्या कलम ४(२)(क) नुसार प्राधिकरणाचा अध्यक्ष हा कर्तृत्ववान, प्रामाणिक व प्रतिष्ठित व्यक्ती असावी. तसेच कलम ४(२)(ख) नुसार प्राधिकरणाचे चार सदस्य हे त्यांच्या त्यांच्या क्षेत्राशी संबंधित समस्या हाताळण्याचे पुरेसे ज्ञान, अनुभव आणि त्यासंबंधातील क्षमता सिद्ध केलेल्या कर्तृत्ववान, प्रामाणिक व प्रतिष्ठित व्यक्ती असाव्यात, अशी तरतूद करण्यात आली आहे.

कलम ४ च्या पोट-कलम (१) मधील खंड (ख) ते (च) मध्ये नमूद केलेल्या सदस्य व तज्ञ यांनी कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची किंवा संस्थेची किमान स्नातक पदवी एवढी शैक्षणिक अर्हता आणि त्यांच्या क्षेत्रात किमान वीस वर्षांचा कार्यसिद्ध अनुभव असणे आवश्यक आहे.

-----०-----

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम-१९६० मध्ये सुधारणा

**सहकारी संस्थांच्या मंडळावर कर्मचाऱ्यांना वाढीव प्रतिनिधित्व देण्यासाठीचा अध्यादेश पुनर्रप्रख्यापित करण्याचा निर्णय**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम-१९६० मध्ये सुधारणा करून शासनाचे भागभांडवल असणाऱ्या संस्थांच्या संचालक मंडळावर दोन शासननियुक्त अधिकाऱ्यांऐवजी एक शासकीय अधिकारी आणि शासननियुक्त प्रतिनिधी नेमण्यात येणार आहे. त्यासाठी या अधिनियमाच्या कलम ७३-अअअ (२) मध्ये सुधारणा करण्यासाठीचा अध्यादेश पुनर्रप्रख्यापित करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

यासंदर्भातील १८ एप्रिल २०१६ रोजी पुनर्रप्रख्यापित करण्यात आलेला २०१६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. ७ पावसाळी अधिवेशनात विधेयक स्वरुपात विधानसभेत मांडण्यात आले. त्यास १ ऑगस्ट २०१६ रोजी मंजुरी देण्यात आली. मात्र, अधिवेशन कालावधित या विधेयकास विधानपरिषदेची मंजुरी न मिळाल्याने तो पुनर्रप्रख्यापित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम-१९६० च्या कलम-७३-अअअ नुसार संस्थांच्या व्यवस्थापक समितीमध्ये एक कर्मचारी प्रतिनिधी नियुक्त करण्याची तरतूद आहे. तसेच शासनाचे भागभांडवल असणाऱ्या संस्थांच्या व्यवस्थापक समितीत शासनाने नामनिर्देशित केलेले दोन शासकीय अधिकारी सदस्य असतील अशीही तरतूद आहे. संस्थांच्या व्यवस्थापक मंडळावर संबंधित संस्थेच्या कर्मचाऱ्यांमधून केवळ एक प्रतिनिधी संचालक मंडळावर नेमण्याची तरतूद आहे. त्यात सुधारणा करून दोन प्रतिनिधी नेमावेत अशी कर्मचारी संघटनांची मागणी आहे. त्यादृष्टीने शासनाने संस्थेच्या कर्मचाऱ्यांना व्यवस्थापनात पुरेसे प्रतिनिधित्व देण्यासाठी निर्णय घेतला आहे.

त्यानुसार शासनाने नामनिर्देशित करावयाच्या दोन अधिकाऱ्यांऐवजी एक सदस्य संस्थेच्या कामकाजाबाबत अनुभव असणारा सदस्य असणे आवश्यक करण्यात आले आहे. या बदलासाठी सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम २ (१४-अ) मधील कार्यलक्षी संचालकाची व्याख्या सुधारित करणे व कलम ७३-अअअ (२) चे दुसरे, तिसरे व चौथे परंतुक यामध्ये सुधारणा करून कार्यलक्षी संचालक व शासन नामनिर्देशित संचालक यांच्या नियुक्तीच्या तरतुदीत सुधारणा करण्यात आली आहे.

-----०-----

अनियमित, बेकायदेशीर कामकाजामुळे अडचणीतील बँका

**सहकारी बँकांच्या संचालकांना अपात्र ठरविण्यासाठीचा**

**अध्यादेश पुनर्रप्रख्यापित करण्याचा निर्णय**

अनियमित आणि बेकायदेशीर कामकाजामुळे सहकारी बँक अडचणीत येण्यास कारणीभूत ठरलेल्या संचालकास बँकेचे संचालकपद धारण करण्यासाठी अपात्र घोषित करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. त्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ७३ (क) (अ) मध्ये नव्याने कलम समाविष्ट करण्यासाठीचा अध्यादेश पुनर्रप्रख्यापित करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

यासंदर्भातील १८ एप्रिल २०१६ चा अध्यादेश क्र. ६ विधानसभेत विधेयक स्वरूपात ४ ऑगस्ट २०१६ रोजी चर्चेस येऊन संमत झाले. मात्र, ५ ऑगस्ट २०१६ रोजी विधानपरिषदेच्या कार्यक्रमपत्रिकेत दर्शविलेले विधेयक संमत होऊ शकले नाही. त्यामुळे यासंबंधीचा अध्यादेश पुनर्रप्रख्यापित करण्यास राज्यपालांना शिफारस करण्याचा निर्णय घेण्यात आला.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ७३ क अ मध्ये (३A) समाविष्ट करून त्यानुसार सहकारी बँकेच्या संचालकास त्या बँकेवर अथवा अन्य कोणत्याही बँकेवर संचालक मंडळाच्या दोन कालावधीसाठी संचालक पद धारण करण्यास अपात्र ठरविण्याबाबतची तरतूद नव्याने समाविष्ट करण्यात आली आहे. बँक बरखास्त झाल्याच्या दिनांकापासून संचालक मंडळाच्या पुढील दोन कालावधीसाठी संबंधित दोषी संचालकास अपात्र ठरविण्यात येणार आहे.

-----०-----

शेतकऱ्यांची फळे व भाजीपाला विक्री

**बाजारपेठेचे पर्याय खुले करण्यासाठी**

**अध्यादेश पुनर्रप्रख्यापित करण्याचा निर्णय**

राज्यातील शेतकऱ्यांच्या फळे व भाजीपाला विक्रीसाठी आश्वासित, विश्वासार्ह, स्पर्धात्मक बाजारपेठेचे पर्याय खुले करण्यासाठी महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियम) अधिनियम-१९६३ मधील काही कलमांमध्ये सुधारणा करणे किंवा नवीन कलमांचा समावेश करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. त्यासाठीचा अध्यादेश पुनर्रप्रख्यापित करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

यासंदर्भातील ५ जुलै २०१६ चा अध्यादेश क्र. १५ विधानसभेत विधेयक स्वरूपात ३ ऑगस्ट २०१६ रोजी संमत झाले. मात्र, विधानपरिषदेत या विधेयकावर चर्चा न झाल्याने विधेयक संमत होऊ शकले नाही. त्यामुळे यासंबंधीचा अध्यादेश पुनर्रप्रख्यापित करण्यास राज्यपालांना शिफारस करण्याचा निर्णय घेण्यात आला.

पणन अधिनियमात काही तरतुदींचा समावेश केल्यामुळे शेतकऱ्यांचे व्यापक हित साध्य करणे शक्य होणार आहे. त्यानुसार केंद्र शासनाच्या राष्ट्रीय कृषी बाजार (NAM) योजनेत सहभागी होण्यासाठी ई-ट्रेडिंग सिंगल पॉईंट लेव्हीसारख्या तरतुदी करण्यात येणार आहेत. शेतकऱ्यांना विक्रीचे अनेक पर्याय उपलब्ध करून दिल्यामुळे त्यांचा शेतीमाल खरेदी करण्यासाठी अनेक खरेदीदार पुढे येतील. त्यातून स्पर्धा निर्माण होऊन शेतकऱ्यांच्या शेतीमालाला योग्य भाव मिळेल. तसेच व्यापाऱ्यांकडून अडत वसूल करण्याची तरतूदही त्यात समाविष्ट असेल.

-----०-----